**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : पांडुरंग चिमाजी साळवे
वय : ६३ वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त ,
राहणार : कळंबई, ता. आंबेगाव, जि. पुणे.

**सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती एस. आर. पाचारणे**

१. आरोपी प्रमोद आणि मनोज ही माझी मुले आहेत. आरोपी कमल ही माझी पत्नी आहे. दि.१४/११/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. सदरची घटना माझ्या घरासमोर घडली. मी माझा पुतण्या दिलीप लक्ष्मण साळवे याला माझ्या हिश्याच्या जमीनीची मशागत करण्यासाठी सांगितले होते. तो मशागत करण्यासाठी गेला तेव्हा आरोपी प्रमोद, मनोज आणि कमल यांनी त्या आडकाठी केली आणि म्हणाले " माझ्या शेतामध्ये अजिबात काही करायचे नाही, मशागत करायची नाही". त्यानंतर शिवीगाळ करून त्याला हाकलून लावले. सदर घटनेसंदर्भात मी वरील आरोपींना जाब विचारण्यास गेलो असता ते म्हणाले की "शेत आमच्या नावावर करून द्यायचे, घरात व शेतात परत पाऊल ठेवायचे नाही". त्यानंतर मी त्यांना म्हणालो "मी जिवंत असताना शेत तुमच्या नावावर कसे करून देऊ, ते शेत माझी बहीण, भाऊ व माझ्या नावावर आहे, त्यामुळे मी शेत तुमच्या नावावर कसे करून देऊ". यावर कमल म्हणाली " शेत आमच्या नावावर कसे करून देत नाही ते बघतेच आता" असे म्हणून त्यांनी मुलांना चिथावणी दिली.

२. त्यानंतर वरील तीनही आरोपींनी मिळून मला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरवात केली. तसेच तिथे पडलेले लाकडी दांडके, लोखंडी सळई व विटेणे मारहाण करण्यास सुरूवात केली. मनोज याने खाली पाडून अंगावर बसुन लोखंडी सळईने पाठीवर , डोक्यावर व पायावर मारहाण केली. तसेच डाव्या डोळ्याच्या खाली विट फेकून मारली. प्रमोद याने लाकडी दांडक्याने पाठीवर, पायावर, हातावर, डाव्या खांद्यावर तसेच उजव्या हाताच्या बोटांवर मारहाण केली. मी रक्तबंबाळ झालेला पाहून ते तेथून बाजूला झाले. मी माझा जिव वाचवण्याच्या

इराद्याने मंचर पोलीस स्टेशन येथे पोहोचलो. तेथे पोलीस आमलदार साबळे साहेब यांनी माझी अवस्था पाहुन मला मेमो देऊन ताबडतोब उप जिल्हा रूग्णालय, मंचर येथे पाठविले. तेथे डॉक्टरांनी माझ्या जखमांवर उपचार करून मला अर्धा तास तिथे थांबविले. त्यांनतर मी पुन्हा मंचर पोलीस स्टेशन येथे आलो. १.५० वाजता पोलीसांनी माझा जबाब नोंदवून घेतला.

३. आता मला दि.१४/११/२०२१ रोजीचा माझा फिर्यादी जबाब दाखवला. तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. २२** देण्यात येते. आता मला १४/११/२०२१ रोजीची छापील खबर दाखवली. ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. २३** देण्यात येते.

४. मला आरोपींने ज्या लाकडी दांडक्याने, लोखंडी सळईने व विटाने मारले ते मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता सरकारी वकीलांनी आरोपी व त्यांच्या वकीलांसमोर समोर पंचाच्या सह्यांचे लेबल लावलेले तीन वेगवेगळ्या खाकी कव्हर मध्ये गुंडाळलेला सिलबंद मुद्देमाल पी.आर. नं.२३/२०२४ कोर्टासमोर उघडला. सदर मुद्देमाल साक्षीदारास दाखविण्यात आला. सदरचा मुद्देमालात एक लाकडी दांडके, एक लोखंडी सळई व एक विटेचा तुकडा आहे. सदर एक लाकडी दांडके, एक लोखंडी सळई व एक विटेचा तुकडा साक्षीदाराने ओळखले व त्याच लाकडी दांडक्याने, लोखंडी सळईने व विटेच्या तुकड्याने त्याला मारहाण झाल्याचे सांगितले. सदर लाकडी दांडके, लोखंडी सळई व विटेचा तुकडा याला ओळखण्यापुर्ता अनुक्रमे **आर्टीकल अ, ब व क** देण्यात येते.

५. वरील आरोपी ज्यांनी मला मारहाण केली त्यांना मी ओळखतो. ते आज रोजी कोर्टामध्ये हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास : आरोपीतर्फे वकील श्री. आर. एन. मुल्ला यांच्यामार्फत</u>**

६. मी आरोपींसोबत २५ ते ३० वर्षांपासून कळंबई, ता. आंबेगाव, जि. पुणे येथे राहतो. मी ट्रेनिटी फार्मासुटीकल कॉलेज कापूरओळ, ता. भोर, जि. पुणे येथे लेक्चरर म्हणून

कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी कळबंई गावात शेतकरी म्हणून काम केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी १ व २ हे लहान असताना मी आरोपी क्र. १, २ व ३ सोबत चिंचपोकळी, मुंबई येथे राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, चिंचपोकळी येथे राहत असताना मी मेडीकलचे शिक्षण पुर्ण केले व सन १९८१ मध्ये डॉक्टर झालो.

७. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८८ मध्ये मी डॉक्टर झालो तेव्हा चिंचपोकळी येथील राहते घर सोडून निघून गेलो. सन १९८८ मध्ये मी घर सोडून निघून गेलो तेव्हा आरोपी क्र.३ यांनी सी. आय. डी. मुंबई येथे माझी मिसींगची तक्रार दिली याबद्दल मला माहीती नाही. सी. आय. डी. मुंबई यांनी दि. ३१/१०/१९८९ रोजी माझी मिसींगची तक्रार नोंदवुन घेतली, त्यांचा नंबर ५१७/८९ आहे. त्यानंतर दि.२९/१२/१९८९ ला मिसींगचे सर्टीफिकेट दिले याबाबत मला माहीती नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की. आरोपी क्र.३ हीने पुणे येथील कौटूंबिक न्यायालयात फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम १२५ अन्वये पोटगीसाठी अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या अर्जाचा पिटीशन नं.१०५/२०१६ आहे. प्रभाकर कळमकर व डॉ. दिपक सिताराम देसाई ही टोपण नावे सदरच्या अर्जामध्ये नमूद आहेत. साक्षीदार स्वतः सांगतो की, ही नावे आरोपी क्र. ३ ने दाखल केली आहे. ती मला मान्य नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पांडुरंग चिमाजी साळवे, प्रभाकर कळमकर व डॉ. दिपक सिताराम देसाई ही नावे माझीच आहेत.

९. सदरच्या अर्जामध्ये नमुद पत्ता मथुराकुंज गृह रचना सहकारी संस्था मर्या. दुसरा मजला, सर्वे क्र.१२६, हिस्सा नं. २/अ, प्लॉट नं.१६ व १७, कोथरूड, पुणे ४११ ०३८ हा आरोपी क्र. ३ हीने दिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या पत्त्यावर मला कौंटुबिक न्यायालयातील अर्जाचे समन्स मिळाले. साक्षीदार पुन्हा सांगतो की, सदरचे समन्स मला मिळाले नसुन तिथे राहणाऱ्या व्यक्तीने फोन करून सांगितले व ते परत पाठविले. ते समन्स मी कोर्टाच्या बेलिफ रूम मधून घेतले. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या पोटगीच्या केसमध्ये मी हजर होऊन जबाब दिला. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या पोटगीच्या केसमधील माझ्या जबाबामध्ये मी मथुराकुंज गृह रचना सहकारी संस्था मर्या. दुसरा मजला, सर्वे क्र.१२६ हिस्सा नं.२/अ, प्लॉट नं. १६ व १७, कोथरूड, पुणे ४११ ०३८ येथे राहत नसुन कळंबई येथे राहतो

असे म्हणलो नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८८ ते सन २०१६ पर्यंत वरील सर्व आरोपी हे माझ्यापासून वेगळे राहत होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी त्यांच्याकडे येवुन- जावून होतो. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८८ ते सन २०१६ या काळामध्ये आरोपींने हालाखीचे दिवस काढले व आरोपी क्र. ३ हीने आरोपी क्र. १ व २ यांचा सांभाळ केला.

**साक्षीदाराच्या तोंडी विंनतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**२ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. २१/०२/२०२५**
**घोडेगाव**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

**<u>पुढील उलटतपास : आरोपीतर्फे वकील श्री. आर. एन. मुल्ला यांच्यामार्फत</u>**

११. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पत्नीने लग्नानंतर तिचे नाव कमल प्रभाकर साळवे असे लावले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ व २ ही माझी मुले आहेत व त्यांनी त्यांचे नाव मनोज प्रभाकर साळवे व प्रमोद प्रभाकर साळवे असे लावले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे नाव प्रभाकर साळवे ऐवजी डॉ. दिपक सिताराम देसाई असे करुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे नाव डॉ. दिपक सिताराम देसाई असे करुन घेऊन एका स्त्री सोबत मथुराकुंज, गृहरचना सहकारी संस्था मर्यादित, दुसरा मजला, कोथरुड, पुणे येथे राहतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर स्त्री चे नाव शैलजा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. ३ सोबतचे लग्न अस्तित्वात असतांना देखील शैलजा हिच्यासोबत लग्न केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर लग्नापासुन मला एक मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की, शैलजा ही तिचे नाव शैलजा दिपक देसाई असे लावते. हे म्हणणे खरे नाही की, मी शैलजासोबत मिळुन कोथरुडमध्ये एक फ्लॅट खरेदी केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर फ्लॅटचा पत्ता मथुराकुंज, गृहरचना सहकारी संस्था मर्यादित, दुसरा मजला, कोथरुड, पुणे असा आहे.

१२. हे म्हणणे खरे नाही की, मी १९९८ सालापासुन २०१६ पर्यंत बेपत्ता होतो, तो कालावधी आरोपी क्र. १ ते ३ साठी अत्यंत कठीण होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ व २ हे २०१० साली सज्ञान झाले व चिंचपोकळीवरुन कळंब या गावी राहण्यासाठी आले. हे म्हणणे खरे नाही की, गावाला आल्यानंतर त्यांनी माझ्या भावाकडे शेतजमिनीची व घर बांधण्यासाठी जागेची मागणी केली. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा माझ्या भावाने त्यांना एक एकर जमिन शेतीसाठी व अर्धा गुंठा जमिन घर बांधण्यासाठी दिली. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१० पासुन आरोपी क्र. १ ते ३ हे सदर जमिनीवर राहु लागले. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१६ मध्ये कळंब गावातील काही लोकांनी मला मयुर बार एन्ड रेस्टॉरंट, मंचर येथे माझ्या भावासोबत मला बघितले व सदर बाब त्या लोकांनी आरोपी क्र.१ व २ यांना सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आरोपी क्र. १ व २ यांनी मला विनंती केली व घरी येण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी मी आरोपी क्र.३ यांना भेटलो व त्या

दिवसापासुन आमच्या भेटीगाठी सुरु झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, दि.१६/०६/२०१६ रोजी मी आरोपी क्र.२ यांना मयुर बार येथे बोलाविले व मी दारु पिलो. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी मी दारु पिऊन गाडी चालवली व माझ्या कोथरुड येथील घरी गेलो. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी शिवाजी नगर येथील आर.टी.ओ. ने माझी गाडी पकडली.

*( आरोपीच्या वकीलांनी शिवाजी नगर येथील आर.टी.ओ. ने गाडी पकडली तसेच २०१६ मध्ये घडलेल्या घटनांबद्दल प्रश्न विचारले. सदर प्रश्नांवर सरकारी वकीलांनी हरकत घेतली. आरोपीच्या वकीलांचे व सरकारी वकीलांचे म्हणणे ऐकले. सन २०१६ मध्ये घडलेल्या घटनांचा व आर.टी.ओ. ने गाडी पकडल्याचा सदर केसशी काहीही संबंध नसल्याने सरकारी वकीलांची हरकत मान्य करण्यात येते. )*

१३. हे म्हणणे खरे नाही की, मी कळंबई ता. आंबेगाव, जि. पुणे येथे आरोपीसोबत राहतो असे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पत्ता देऊन खोटे मतदान ओळखपत्र काढले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.१४/११/२०२१ म्हणजेच घटनेच्या दिवशी मी माझ्या घरी नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी मी माझ्या शेतीची मशागत माझा पुतण्या दिलीप साळवे याच्याकडुन करुन घेत नव्हतो. मी घटनेच्या दिवशी माझा पुतन्या दिलीप साळवे याच्याकडून शेतीची मशागत करुन घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी दिलीप साळवे याला आरोपी क्र. १ ते ३ यांनी शेतीची मशागत करतांना रोखलेही नाही व हाकलूनही दिले नाही.

**मध्यांतर झाल्याने पुढील उलटतपास दुस-या सत्रापर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. ११/०९/२०२५**
**घोडेगाव**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

**<u>पुढील उलटतपास : आरोपीतर्फे वकील श्री. आर. एन. मुल्ला यांच्यामार्फत</u>**

१४. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी आरोपी मला शेतजमिन आमच्या नावावर करुन द्या असे म्हणाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी सदरची शेतजमिन ही माझे बहिण, भाऊ व माझ्यामध्ये सामाईक आहे, त्यामुळे मी ती शेतजमिन तुमच्या नावावर कशी करुन देऊ असे म्हणालो नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी आरोपींनी " शेत आमच्या नावावर कसे करुन देत नाही ते बघतोच आता " अशी धमकी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ यांनी आरोपी क्र.१ व २ यांना मला मारण्याकरीता चिथावणी दिलेली नाही.

१५. हे म्हणणे खरे नाही की, सर्व आरोपींनी मला लाथाबुक्क्यांनी मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला लाकडी दांडक्याने, लोखंडी सळईने मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला वीट फेकून मारली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ मनोज याने मला खाली पाडुन लोखंडी सळईने पाठीवर, डोक्यावर व पायावर मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याने माझ्या डाव्या डोळ्यावर मारहाण केलेली नाही व वीटही फेकून मारली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ प्रमोद याने मला लाकडी दांडक्याने पाठीवर, पायावर, हातावर व डाव्या खांद्यावर मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या मारहाणीमध्ये मला कोणतीही दुखापत झाली नाही तसेच त्या दिवशी अशी कोणतीही घटना घडली नाही.

१६. मी पोलीसांना जबाब देतेवेळी आरोपी क्र.१ ते ३ यांनी मला " शेतजमिन आमच्या नावावर करुन द्यायचे, घरात व शेतात परत पाऊल ठेवायचे नाही ” अशी धमकी दिली तसेच मी त्यांना त्यावेळी म्हणालो की, " मी जिवंत असतांना शेत तुमच्या नावावर कसे करुन देऊ, ते शेत माझे बहिण, भाऊ व माझ्या नावावर आहे त्यामुळे मी शेत तुमच्या नावावर कसे करुन देऊ " असे सांगितले होते. सदरचा मजकुर पोलीसांनी माझ्या जबाबात का नमुद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला कोणत्याही

प्रकारची धमकी दिली नाही म्हणुन मी पोलीसांना जबाब देतेवेळी तसे सांगितले नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी " आरोपी क्र.३ हिने शेत आमच्या नावावर कसे करुन देत नाही ते बघते आता " असे म्हणुन आरोपी क्र.१ व २ यांना चिथावणी दिली होती हे मी सांगितले होते. सदरचा मजकुर पोलीसांनी माझ्या जबाबात का नमुद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

१७. मी पोलीसांना जबाब देतेवेळी मनोज याने मला खाली पाडुन अंगावर बसुन लोखंडी सळईने पाठीवर, डोक्यावर व पायावर मारहाण केली तसेच डाव्या डोळ्याच्या खाली विट फेकून मारली हे सांगितले होते. परंतु सदरचा मजकुर पोलीसांनी माझ्या जबाबात का नमुद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मनोज याने मला मारहाण केली नव्हती म्हणुन मी सदरचा मजकुर पोलीसांना सांगितला नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी प्रमोद याने लाकडी दांडक्याने पाठीवर, पायावर, हातावर, डाव्या खांद्यावर तसेच उजव्या हाताच्या बोटांवर मारहाण केली. मी रक्तबंबाळ झालेला पाहून ते तेथून बाजूला झाले हे सांगितले होते. सदरचा मजकुर पोलीसांनी माझ्या जबाबात का नमुद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी प्रमोद याने मला मारहाण केली नव्हती म्हणुन मी सदरचा मजकुर पोलीसांना सांगितला नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मला आरोपींनी मारहाण केली नाही व मी खोटी फिर्याद दाखल केली आहे.

१८. आरोपी क्र.३ हिने कौटूंबिक न्यायालयात माझ्याविरुध्द पोटगीचा खटला दाखल केला आहे. त्यामध्ये न्यायालयाने महिना रक्कम रु.७,०००/- पोटगी आरोपी क्र.३ ला देण्याचा आदेश दिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर पोटगीची थकबाकी वसुल करण्याकरीता आरोपी क्र.३ हिने कौटूंबिक न्यायालयात थकबाकी वसुलीचा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.१३/११/२०२१ रोजी मी माझ्या पत्नीला म्हणजेच आरोपी क्र.३ हिला भेटुन " सदर थकबाकी वसुलीचा अर्ज मागे घे नाहीतर याचे वाईट परिणाम होतील " असे म्हणालो. सदर घटनेच्या संदर्भात आरोपी क्र.३ हिने मंचर पोलीस स्टेशन येथे एन.सी.आर. दाखल केला किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेचा जाब विचारण्यासाठी मी दि.१४/११/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता कळंबई येथे

आरोपीच्या राहत्या घरी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या गाडीतुन लाकडी दांडका, लोखंडी सळई आणि दोन विषारी स्प्रे च्या बाटल्या घेऊन गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ हिने मंचर पोलीस स्टेशन इथे दिलेल्या एन.सी.आर.चा राग मनात धरुन मी दि.१४/११/२०२१ ला जाब विचारण्यासाठी गेलो होते. हे म्हणणे खरे नाही की, मी तेथे जाऊन आरोपींच्या डोळ्यामध्ये विषारी स्प्रे मारला. हे म्हणणे खरे नाही की, सदर स्प्रे मारल्यामुळे त्यांच्या डोळ्यात आग होऊ लागली व त्यांना समोरचे दिसेनासे झाले. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळी तिन्ही आरोपींना लाकडी दांडक्याने मारण्यास सुरुवात केली.

१९. हे म्हणणे खरे नाही की, सदर मारहाणीमध्ये आरोपी क्र.१ चा डावा हात फ्रॅक्चर झाला व त्याला मारहाणीच्या जखमा झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ व ३ यांना सुध्दा लाकडी दांडक्याने मारल्यामुळे मारहाणीच्या हाता पायावर जखमा झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, सदर मारहाणीचा आवाज झाल्याने तेथील शेजारी गणेश कोंडाळकर हे तेथे आले. त्यानंतर गणेश कोंडाळकर याने तिन्ही आरोपींना मंचर पोलीस स्टेशनला नेले किंवा कसे हे मला माहिती नाही. त्यानंतर मंचर पोलीस स्टेशनने आरोपींना दवाखान्यात उपचार घेण्यासाठी यादी दिली व ते आरोपी ग्रामीण रुग्णालय मंचर येथे गेले किंवा कसे हे मला माहिती नाही. गणेश कोंडाळकर याने खाजगी वाहनाने आरोपींना मंचर पोलीस स्टेशनला नेले तसेच आरोपी मंचर पोलीस स्टेशनमधुन ग्रामीण रुग्णालयात खाजगी वाहनाने गेले किंवा कसे हे मला माहिती नाही. मंचर ग्रामीण रुग्णालय येथे आरोपींवर प्रथमोपचार झाले. आरोपींच्या डोळ्यावर पाणी मारले असता त्यांच्या डोळ्यात प्रचंड आग होऊ लागली त्यामुळे मंचर ग्रामीण रुग्णालय यांनी आरोपींना ससुन हॉस्पिटल, पुणे येथे पाठविले.

२०. ससुन हॉस्पिटल येथे गेल्यानंतर आरोपी क्र.१ ची मेडीकल लिगल केस नं.२३३९५ दि.१४/११/२०२१ नोंदविण्यात आली तसेच त्याचा केस पेपर क्र.२१७१५२१ होता किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ च्या डोळ्यांवर व हातावर ससुन हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले. सदर उपचारामध्ये आरोपी क्र. १ चा डावा हात फ्रॅक्चर आहे असे निदान करण्यात आले. ससुन हॉस्पिटल येथे आरोपी क्र.२ ची मेडीकल लिगल केस नं.२३३८८ दि.१४/११/२०२१ नोंदविण्यात आली आली तसेच त्याचा केस पेपर क्र.२१७१५२२ होता किंवा कसे हे मला माहिती नाही. त्याने मारहाणीबाबत तेथे

उपचार घेतले किंवा कसे हे मला माहिती नाही. ससुन हॉस्पिटल येथे आरोपी क्र.३ ची मेडीकल लिगल केस नं.२३३८९ दि.१४/११/२०२१ नोंदविण्यात आली आली तसेच त्याचा केस पेपर क्र.२१७१५२३ होता किंवा कसे हे मला माहिती नाही. त्याने मारहाणीबाबत तेथे उपचार घेतले किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे नाव प्रभाकर साळवे आहे म्हणुन आरोपी क्र. १ ते ३ यांनी त्यांच्या मेडीकल पेपरवर त्यांचे मनोज प्रभाकर साळवे, प्रमोद प्रभाकर साळवे, कमल प्रभाकर साळवे असे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मारहाण केलेली नाही व मी त्यांच्याविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, गुन्ह्यातील मुद्देमाल हा मी आणलेला आहे व तो आरोपींचा नाही. या घटनेबाबत आरोपींनी माझ्याविरुध्द खाजगी दावा दाखल केला आहे व तो याच न्यायालयात प्रलंबित आहे किंवा कसे हे मला माहित नाही.

२१. आता मला आरोपी क्र.३ हिने कौटुंबिक न्यायालय, पुणे येथे दाखल केलेला फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१०५/२०१६ दाखविला. त्यास **निशाणी क्र.२६** देण्यात येते. सदर अर्जामध्ये मी हजर होऊन निशाणी क्र.८ ला जबाब दाखल केला. सदरचा जबाब आता मला दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.२७** देण्यात येते. आता मला एक फोटो दाखविण्यात आला. त्यामध्ये मी व एक लहान मुलगी आहे. सदर फोटोला **आर्टिकल डी** देण्यात येतो.

**आरोपीतर्फे वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. ११/०९/२०२५**
**घोडेगाव**